# जांभरुणवासियांचा 'स्त्री जन्माचे स्वागत' आदर्श उपक्रम

## जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंह; मुलींचा सन्मान सोहळा



**वाशीम :** आदर्श ग्राम जांभरुण महाली येथे दुर्गा मंडळाच्या वतीने नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित केलेला 'स्त्री जन्माचे स्वागत' हा आदर्श उपक्रम असल्याचे प्रतिपादन जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांनी केले. गावकऱ्यांच्या पुढाकारातून श्री जम्बुकेश्वर दुर्गा उत्सव मंडळाच्या वतीने ३ रोजी आयोजीत नवजात मुलींच्या सन्मान सोहळा कार्यक्रमात ते बोलत होते.

या कार्यक्रमाला जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंह, जेष्ठ पत्रक ार माधवराव अंभोरे, वाशीम ग्रामीण पोलीस स्टेशनचे ठाणेदार विनोद झळके आदिंची उपस्थिती होती. पुढे बोलताना बच्चन सिंह म्हणाले, अलिकडच्या काळात विविध सामाजिक उपक्रम राबवून धार्मिक सणोत्सव साजरे केले जात आहेत. मात्र, यामध्ये जांभरुण येथील जम्बुकेश्वर दुर्गा मंडळाने स्त्री जन्माच्या स्वागताचा उपक्रम हा गावाचे वेगळेपण दर्शविणार आहे. अशा उपक्रमाचा आदर्श घेवून इतर गावकऱ्यांनी ही प्रथा पुढे नेणे काळाची गरज असल्याचेही ते म्हणाले. दरम्यान, पत्रकार माधवराव अंभोरे यांनी गावकऱ्यांनी आपले वेगळेपण जपत कायम ठेवलेला सामाजिक सलोख्याचे कौतुक केले. याप्रसंगी गावात एका वर्षात जन्मलेल्या मुलींना ड्रेस तसेच त्यांच्या आईचा साडीचोळी देवून सन्मान करण्यात आला. सोबतच गावातील सेवानिवृत्त कर्मचारी, गुरा-ढोरांसाठी निशुल्क पाण्याची व्यवस्था करणारे सामाजिक कार्यकर्त्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला गावातील महिला, पुरुष मंडळी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप महाले यांनी तर आभार प्रदर्शन गजानन ठाकरे यांनी केले.